महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
औद्योगिक संबंध विभाग, प्रकाशगड, ४ था मजला, प्लॉट जी-९, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१.
Email : ciro@mahadiscom.inwebsite : www.mahadiscom.inदूरध्वनी क्र. २६४७२१३१ / २६४७४२११
सी. आय. एन. नं. U४०१०९MH२००५SGC१५३६४५

जा.क्र. औसंवि/ब/क्रीडा/दैनिक पुरक भत्ता/ No - 2455 दिनांक : 23 JAN 2020

# परिपत्रक

विषय : महावितरण कंपनीचे खेळाडू / कलाकार व इतर संबंधित कर्मचाऱ्यांना स्पर्धेसाठी दौऱ्यावर असतांना द्यावयाच्या सुधारीत दैनिक पूरक भत्त्याच्या दराबाबत.

संदर्भ : परिपत्रक क्र. औसंवि/ब/क्रीडा/१४६०७ दि. १५/०६/२०१७.

************

संदर्भीय परिपत्रकान्वये महावितरण कंपनीच्या खेळाडू / कलाकार व इतर संबंधित कर्मचाऱ्यांना विविध स्तरावरील मान्यताप्राप्त क्रीडास्पर्धा व नाट्यस्पर्धेसाठी दौऱ्यावर असतांना रु. ५००/- प्रतिदिन अशा वाढीव दराने दैनिक पूरक भत्ता मंजूर करण्यात आला आहे. परंतू, काही मान्यताप्राप्त क्रीडा व नाट्यस्पर्धेत खेळाडू / कलाकारांच्या निवासाची व्यवस्था स्पर्धा आयोजकाकडून करण्यात येत नाही. परिणामी, अशा स्पर्धेत सहभागी होणाऱ्या खेळाडू / कलाकारांना त्यांच्या निवासाचा खर्च स्वत: करावा लागतो. त्यामुळे मान्यताप्राप्त क्रीडा व नाट्यस्पर्धेत सहभाग घेण्यासाठी महावितरण कंपनीचे खेळाडू / कलाकार व इतर संबंधित कर्मचारी दौऱ्यावर असतांना निवासाची व्यवस्था केली नसल्यास त्यांना देण्यात येणाऱ्या दैनिक पूरक भत्त्यामध्ये वाढ करण्याबाबतचा प्रस्ताव प्रशासनाच्या विचाराधीन होता.

२. याबाबत सर्वकष विचाराअंती, मा. अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक (महावितरण) यांनी संचालक (वित्त), संचालक (संचालन), संचालक (प्रकल्प), संचालक (वाणिज्य) व संचालक (मानव संसाधन) यांचेशी विचारविनिमय करुन कंपनीतंर्गत राज्यस्तरीय वार्षिक आंतर परिमंडलीय क्रीडास्पर्धा, प्रादेशिक विभागस्तरीय आंतर परिमंडलीय नाट्यस्पर्धा, राज्यस्तरीय आंतर विभाग नाट्यस्पर्धा, आंतर कंपनी क्रीडा व नाट्यस्पर्धा, विविध स्तरावरील मान्यताप्राप्त क्रीडा संघटनेद्वारा आयोजित जिल्हा / राज्य / राष्ट्रीय क्रीडास्पर्धा आणि अखिल भारतीय विद्युत क्रीडा नियंत्रण मंडळाच्या विविध क्रीडास्पर्धा तसेच महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ व महाराष्ट्र शासनाच्या वतीने आयोजित राज्य नाट्यस्पर्धा इत्यादी क्रीडा व नाट्यस्पर्धेत सहभाग घेण्यासाठी महावितरण कंपनीचे खेळाडू / कलाकार व इतर संबंधित कर्मचारी (सर्व वेतनगटातील) दौऱ्यावर असतांना त्या ठिकाणी **स्पर्धा आयोजकांनी निवासाची व्यवस्था केली असल्यास रु. ५००/- या दराने प्रतिदिन दैनिक पूरक भत्ता** अदा करण्यास मंजूरी दिलेली आहे. तसेच, स्पर्धा आयोजकांनी निवासाची व्यवस्था केली नसल्यास संबंधित खेळाडू / कलाकार व इतर संबंधित कर्मचारी (सर्व वेतनगटातील) यांनी तसे स्व: प्रमाणित करुन स्पर्धा कालावधीत हॉटेलमध्ये वास्तव्य केल्याची पावती कार्यालयात सादर केल्यास त्यांना खालील **दराने शहर निहाय (City wise) प्रतिदिन दैनिक पूरक भत्ता** देण्यासाठी मान्यता दिली आहे.



Scanned by CamScanner

| अ. क्र. | शहरांचे नांव | प्रतिदिन दैनिक पुरक भत्ता |
|---|---|---|
| १. | दिल्ली, मुंबई, कोलकत्ता, चेन्नई, बेंगलोर, हैद्राबाद. | रु. १,२००/- |
| २. | पूणे, नागपूर, अहमदाबाद, सुरत, जयपूर, लखनऊ, कानपूर. | रु. १,०००/- |
| ३. | नाशिक, विजयवाडा, विशाखापटणम्, पटना, राजकोट, बडोदरा, फरीदाबाद, जमशेदपूर, धनबाद, कोचिन, जबलपूर, भोपाल, इंदोर, अमृतसर, लुधियाना, कोईबतूर, मदुराई, मेरठ, आग्रा, अलाहाबाद, वाराणसी, आसनसोल. | रु. ८५०/- |
| ४. | अ. क्र. १, २ व ३ मध्ये समावेश नसणारी शहरे. | रु. ७५०/- |

३. उपरोक्त सर्व संबंधित क्रीडा व नाट्यस्पर्धेमध्ये संघातील एकापेक्षा जास्त खेळाडू / कलाकार सहभागी होत असल्यास त्या ठिकाणी संघातील दोन खेळाडू / कलाकार हॉटेलमधील एकाच रुममध्ये वास्तव्य करतील व त्यांना उपरोक्तपणे निश्चित केलेले दर लागु राहतील.

४. दैनिक पूरक भत्त्याचे सुधारीत दर आर्थिक वर्ष सन २०१९-२० पासून अमलात येतील.

५. सदरचे परिपत्रक महावितरण कंपनीच्या Employee Portal वरील Circular (I.R. Department) येथे उपलब्ध असून त्यांची मुद्रांकित प्रत प्रसारीत करण्यात येणार नाही.

**(संजय रा. ढोके)**
**मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी**

**प्रत :-**
**महावितरण कंपनीच्या प्रेक्षण यादीनुसार कार्यकारी** अभियंता, तत्सम स्तरापर्यंत.

D:\SSPisey 3\NATYA KRIDA/Sports Allowance.docx

Scanned by CamScanner